अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०७/०८/२०२४

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २३/२०२४. |
| कलम | कलम ७, ७ अ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| पाहिजे आरोपी लोकसेवक | १) मंदार अशोक तारी, पदनिर्देशित अधिकारी,<br>के पुर्व वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी (पुर्व), मुंबई |
| अटक आरोपी | १) मोहमद शेहजादा मोहमद यामिन शहा, ३३ वर्षे (खाजगी इसम)<br>२) प्रतिक विजय पिसे, ३५ वर्षे (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २ करोड |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ७५ लाख |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची चारमजली इमारत असून त्यामधले वरील दोन मजले हे अनधिकृत असल्याने त्यावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता तसेच नियोजित प्लॉट खरेदी केल्यानंतर तेथील अनधिकृत बांधकामाबाबत सहकार्य करण्याकरीता बीएमसी, के पुर्व वार्ड, मुंबई येथील पदनिर्देशित अधिकारी श्री. मंदार अशोक तारी यांनी तक्रारदार यांचेकडे रू. २ करोड द्यावे लागतील असे सांगून लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३१/०७/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०६/०८/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे अनधिकृत बांधकामावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता व नियोजित प्लॉट खरेदी केल्यानंतर तेथील अनधिकृत बांधकामाबाबत सहाकार्य करण्याकरीता रू. २ करोड इतकी लाचेची मागणी करून पहिला हप्ता रू. ७५ लाख स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पंचासमक्ष तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांच्या सांगणेप्रमाणे उपरोक्त नमूद खाजगी इसमांनी संगनमत करून रोख रक्कम रू. ७५ लाख इतकी लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले, म्हणून लोकसेवक श्री. मंदार अशोक तारी, पदनिर्देशित अधिकारी, बृहन्मुंबई महानगर पालिक, के/पुर्व वॉर्ड, मुंबई व इतर खाजगी इसम यांच्याविरूध्द ला.प्र.वि. मुंबई येथे भ्र.प्र.अधिनियम १९८८ कलम ७, ७ अ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( नितीन दळवी )
महाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :– acbmaharashtra.gov.in, ईमेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
फेसबुक :– www.facebook.com - Maharashtra ACB
मोबाईल ॲप :– www.acbmaharashtra.net